गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३४ पदांना दिनांक १/१०/२०१७ ते दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत पर्यंत चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : मुदतवाढ २०१७/(७३/२०१७)/मोप्र-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०९/०१/२०१८.

पहावे : १) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. आढावा-२०१६/प्र.क्र.१७५/२०१६/आ.(प्रशि), दिनांक ३०/११/२०१६.
२) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. मुदतवाढ २०१७/(७३/२०१७)/मोप्र-२, दिनांक २६/०७/२०१७.
३) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क, दिनांक ०३/१०/२०१७.
४) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे क्र. गोमपाविम/आ-१/७९६४, दिनांक ०९/१०/२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

संदर्भ क्रमांक १ च्या जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयान्वये जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद अंतर्गत बंद होणाऱ्या विभागीय व ३ उपविभागीय कार्यालयांतर्गतच्या मंजूर पदांमधून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयासाठी ३१ पदे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. संदर्भीय क्रमांक २ च्या जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयान्वये, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील कार्यकारी संचालक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अधीक्षक अभियंता या ३ पदांना दिनांक १/१०/२०१६ ते दिनांक ३०/०९/२०१७ व ३१ पदांना दिनांक ३०/११/२०१६ ते दिनांक ३०/०९/२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात आली होती.

आता संदर्भ क्रमांक ४ च्या अनुषंगाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या मागणीनुसार त्यांच्या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३४ पदांना दिनांक ३०/०९/२०१७ ते ३१/०३/२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे संदर्भ क्र. ४ चे पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३४ पदांना (परिशिष्ट - अ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये खालील अटींचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) उपरोक्त सर्व पदे विभागाने प्रस्तावित केलेल्या कालावधीत कार्यरत असतील.
२) ही पदे आकृतीबंधानूसार मंजूर असतील व सहा महिन्याहून अधिक कालावधीसाठी रिक्त नसतील.

यावर होणारा खर्च मागणी क्रमांक आय-५ (नियत अस्थायी आस्थापना) ४७०१-मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०४) (अनिवार्य)- वेतनावरील खर्चासाठी भाग भांडवली अंशदान (०४) (०५) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१ आय २०४) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व महामंडळास वेतनासाठी मंजूर असलेल्या योजनेतर तरतूदीतून भागविण्यात यावा.

उपरोक्त सर्व बाबी तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: पदनि-२०१६/ प्र.क्र. ०८ /आपुक, दिनांक ०३/१०/२०१७ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीनुसार व प्रशासकीय विभागाना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व आंतरवित्त सल्लागार व उप सचिव यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०१०९१७१७५४६४२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ajay Kachruji pawar

Digitally signed by Ajay Kachruji pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fa427e9f588f6677123583b3a1fc1ffcd6f1bdf7b78ab36007e8fe1b9734a2e, cn=Ajay Kachruji pawar
Date: 2018.01.09 17:21:57 +05'30'

सहपत्र : परिशिष्ट अ

(अजय क. पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत सहपत्रासह -

१) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) महालेखापाल-२ (लेखा परीक्षा महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
४) वित्त विभाग (व्यय-१२),मंत्रालय, मुंबई.
५) आ-(प्रशि) /अर्थ-१, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मोप्र-२ कार्यासन संग्रहार्थ.

<u>प्रपत्र-अ</u>

शासन निर्णय क्र : मुदतवाढ-२०१७/प्र.क्र.७३/२०१७/मोप्र-२, दिनांक ०९/०१/२०१८ चे सहपत्र.

नियत अस्थायी आस्थापना एकुण ३४ पदे

कालावधी दिनांक ०१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ या कालावधीसाठी नियत अस्थायी पदे.

अ.क्र.	कार्यालयाचे नांव	पदनाम	पदांची संख्या
१	**२**	**३**	**४**
१	कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद	कार्यकारी संचालक	१
		मुख्य लेखा व वित्त अधिकारी	१
		अधीक्षक अभियंता	१
		प्रथम लिपिक	१
		वरिष्ठ लिपिक	६
		कनिष्ठ लिपिक	६
		लिपिक टंकलेखक / टंकलेखक	५
		लघु टंकलेखक	१
		वाहन चालक	२
		शिपाई	९
		चौकीदार	१
		एकुण :-	**३४**